INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# लोकप्रिय संस्कृती, चिक भाषा आणि साहित्य

प्रा. रोशना अर्जुन जनबंधू
मराठी विभाग प्रमुख
अशोक मोहरकर कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय पहेला, ता +जि. भंडारा
Email- janbandhuroshna@gmail.com

**सारांश :-**

आधुनिक काळात जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे समाजातील सांस्कृतिक प्रवाहामध्ये मोठे बदल झाले आहेत. या बदलामुळे "लोकप्रिय संस्कृती" (Popular Culture) ही संकल्पना विशेष महत्वाची ठरली आहे. लोकप्रिय संस्कृती ही सामान्य लोकांच्या जीवनाशी संबंधित असून ती माध्यमे, मनोरंजन, उद्योग, फैशन, संगीत आणि साहित्य यांच्या माध्यमातून विकसित होत असते. या लोकप्रिय संस्कृतीच्या प्रभावामुळे "चिक भाषा" ( Chick Language) आणि "चिक साहित्य" ( Chick literature) हे नवे साहित्य प्रवाह उदयास आलेले आहे. चिक साहित्य मुख्यतः आधुनिक स्त्रियांच्या जीवनानुभवांवर आधारित असून त्यामध्ये प्रेम संबंध, करिअर, मैत्री, कुटुंबव्यवस्था, स्वातंत्र्य आणि सामाजिक अपेक्षा यांसारख्या विषयाचे चित्रण केले जाते. या साहित्याची भाषा साधी, संवादप्रधान आणि विनोदी स्वरुपाची असते. ज्यामुळे वाचकांशी सहज संवाद साधला जातो. यात लोकप्रिय संस्कृती, चिक भाषा, आणि चिक साहित्य यांचा परस्पर संबंध कसा आहे हे स्पष्ट केले आहे. विशेषत: आधुनिक माध्यमे, जाहिरात, चित्रपट, फॅशन आणि शहरी जीवनशैली यांचा चिकसाहित्यावर कसा प्रभाव पडतो यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच स्त्री अनुभवाचे प्रतिनिधित्व, स्त्रीच्या स्वातंत्र्याची जाणीव आणि सामाजिक बदलांचे प्रतिबिंब साहित्यामध्ये कशाप्रकारे दिसून येते हे स्पष्ट केले आहे. चिक साहित्य हे केवळ मनोरंजनात्मक साहित्य नसून आधुनिक समाजातील स्त्रियांच्या बदलत्या जीवनदृष्टीचे आणि सांस्कृतिक

परिवर्तनाचे प्रतिनिधित्व करणारे महत्त्वाचे साहित्य प्रवाह आहे. चिक भाषा - चिक साहित्य, या माध्यमातून स्त्रियांच्या जीवनाचे वास्तव चित्रण होते. त्यामुळे या साहित्यप्रकाराला आधुनिक मराठी साहित्यामध्ये विशेष महत्व प्राप्त झाले आहे. लोकप्रिय संस्कृतीमुळे हे साहित्य अधिक आधुनिक आणि वास्तववादी झाले आहे. त्यामुळे लोकप्रिय लोकसंस्कृती आणि स्त्री अनुभव समजून घेण्यासाठी चिक साहित्याचा अभ्यास अत्यंत उपयुक्त ठरतो. विशेषत: १९९० नंतरच्या काळात या साहित्यप्रकाराला जागतिक स्तरावर लोकप्रियता मिळाली. लोकप्रिय संस्कृती चिक भाषा, चिक साहित्य हे आधुनिक समाजातील महत्त्वाचे सांस्कृतिक घटक आहेत.

**<u>प्रस्तावना :-</u>**

मानवी समाजामध्ये संस्कृती, भाषा आणि साहित्य यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. आजच्या आधुनिक युगात समाज माध्यमे आणि तंत्रज्ञान, यांच्या प्रभावामुळे, संस्कृतीत मोठया प्रमाणात बदल झाले आहेत. या बदलांमुळे लोकप्रिय संस्कृती ही संकल्पना उदयास आली लोकप्रिय संस्कृती म्हणजे समाजातील सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरली जाणारी, अनुभवली जाणारी आणि स्वीकारली जाणारी संस्कृती होय. चित्रपट दुरदर्शन, सोशल मीडिया, फॅशन, संगीत, भाषा आणि साहित्य या सर्व क्षेत्रावर लोकप्रिय संस्कृतीचा मोठा प्रभाव दिसून येतो. या लोकप्रिय संस्कृतीच्या प्रभावातूनच चिक भाषा आणि चिक साहित्य या संकल्पना विकसित झाल्या आहेत. विशेषत: महिलांच्या अनुभवावर आधारित हलक्या फुलक्या शैलीत लिहिलेले आणि आधुनिक जीवनशैलीचे प्रतिबिंब दाखवणारे साहित्य म्हणजे चिक साहित्य होय. आजच्या तरुणपिढीमध्ये सोशल मीडिया, चित्रपट, वेब सिरिज आणि जाहिरातीच्या माध्यमातून लोकप्रिय संस्कृतीचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे भाषा, विचारसरणी आणि साहित्य निर्मिती मध्येही मोठ्याप्रमाणात बदल होत आहे, पाश्चात्य साहित्यात हा प्रकार मोठयाप्रमाणात आढळतो. परंतू मराठी साहित्यातही अनेक लेखकांनी स्त्रीकेंद्री कादंबऱ्या व कथा लिहून या प्रकाराला समृद्ध केले आहे. यामध्ये लोकप्रिय संस्कृती, चिक भाषा, चिक साहित्य यांचा परस्पर संबंध स्पष्ट केला आहे.

**संशोधनाची मुख्य उद्दिष्टे :-**

१) लोकप्रिय संस्कृतीची संकल्पना स्पष्ट करणे.

२) चिक भाषा आणि तिची वैशिष्ट्ये समजून घेणे.

३) चिक साहित्याचे स्वरूप समजून घेणे.

४) लोकप्रिय संस्कृतीचा चिक साहित्यावर झालेला प्रभाव तपासणे.

५) आधुनिक समाजामध्ये चिक साहित्याचे महत्व समजून घेणे.

**लोकप्रिय संस्कृतीची संकल्पना – स्वरूप :-**

लोकप्रिय संस्कृती म्हणजे समाजातील सामान्य लोकांमध्ये प्रचलित असलेली संस्कृती होय. ती लोकांच्या दैनदिन जीवनातील आवडी, निवडी, मनोरंजन, फॅशन, संगीन चित्रपट आणि सामाजिक व्यवहार यांच्याशी संबंधित असते पूर्वी संस्कृतीचा संबंध मुख्यत: उच्चभ्रू किंवा पारंपारिक सांस्कृतिक परंपराशी जोडला जात होता. परंतु आधुनिक काळात माध्यमाच्या प्रभावामुळे सामान्य लोकांची संस्कृती देखील महत्वाची मानली जाऊ लागली. त्यामुळे लोकप्रिय संस्कृती ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरली. लोकप्रिय संस्कृती ही स्थिर नसून ती सतत बदलत राहते. समाजातील बदल, तंत्रज्ञानाची प्रगती आणि जागतिकीकरण यामुळे लोकप्रिय संस्कृती अधिक व्यापक होत आहे.

**लोकप्रिय संस्कृतीची प्रमुख वैशिष्ट्ये :-**

- ती लोकाभिमुख असते (सामान्य लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात स्वीकारली जाते.)

- ती सतत बदलणारी असते.
- माध्यमाच्या माध्यमातून तिचा प्रसार होतो.
- ती मनोरंजन प्रधान असते.
- ती आधुनिक जीवनशैलीचे प्रतिबिंब दाखवते.
- तरुण पिढीवर तिचा मोठा प्रभाव असतो.

**चिक भाषा :- संकल्पना आणि स्वरूप**

चिकभाषा ही आधुनिक स्त्रियांच्या अनुभवावर आधारित साधी आणि संवादात्मक भाषा आहे. या भाषेमध्ये दैनंदिन जीवनातील बोली भाषेचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. चिक भाषा म्हणजे स्त्रियांच्या अनुभव भावना आणि संवाद यांना व्यक्त करणारी भाषा होय. चिक साहित्यामध्ये वापरली जाणारी भाषा साधी, हलकी आणि विनोदी असते त्यामुळे ती वाचकांना सहज समजते आणि आकर्षक वाटते.

**चिक भाषेची वैशिष्ट्ये :-**

- अनौपचारिकता - चिक भाषेमध्ये औपचारिकतेपेक्षा अनौपचारिकता अधिक असते.
- संवादात्मक शैली - कथनशैली संवाद प्रधान असते.
- विनोद आणि व्यंग - आषेमध्ये हलका विनोद आढळतो.
- आधुनिक शब्दाचा वापर - आधूनिक जीवनातील शब्द संकल्पना वापरल्या जातात.
- भावनिक अभिव्यक्ती - स्त्रियांच्या भावना आणि अनुभवाना महत्व दिले जाते.

**चिक साहित्याची संकल्पना :-**

चिक साहित्य हा आधुनिक साहित्यातील एक महत्वाचा प्रवाह आहे. या साहित्यामध्ये स्त्रियांच्या जीवनातील अनुभव, भावना, संघर्ष आणि स्वपणे यांचे चित्रण केले जाते.

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

या साहित्यप्रकारामध्ये सामान्यत: शहरी जीवनातील स्त्रियांचे अनुभव, करिअर, प्रेमसंबध विवाह मैत्री, आणि सामाजिक अपेक्षा यांचा समावेश असतो हे साहित्य विशेषत: तरुण स्त्रियासाठी लिहिलेले असते.

## चिक साहित्याची वैशिष्ट्ये :-

- स्त्रीकेंद्री कथानक
- आधुनिक शहरी जीवनाचे चित्रण
- प्रेम आणि नाते संबधाचे वर्णन
- हलकी आणि विनोदी शैली
- स्त्रियांच्या, स्वातंत्र्याचा विचार
- स्त्रीची ओळख आणि आत्मशोध
- सामाजिक बंधनावर टिका

## लोकप्रिय संस्कृती आणि चिक साहित्य :-

लोकप्रिय संस्कृतीचा चिक साहित्यावर मोठा प्रभाव आहे. माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे स्त्रियांच्या जीवनातील बदल समाजासमोर येऊ लागले या बदलांचे प्रतिबिंब चिक साहित्यामध्ये स्वस्पष्टपणे दिसते. आधुनिक स्त्रीचे करिअर, प्रेम आणि विवाहातील बदल, स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भरता, सामाजिक अपेक्षांशी संघर्ष, या विषयावर आधारित कथा, आणि कादंबऱ्या मोठ्या प्रमाणावर लिहिल्या जात आहे.

उदाहरणार्थ,

- विभावरी शिरूरकर - <u>यांची हिंदोळ्यावर</u>

या कादंबरीत स्त्रीचे प्रेम, तिचे भाव विश्व आणि समाजातील बंधने यांचे प्रभावित चित्रण केले आहे.

- कमल देसाई - हात घालणारी बाई

  या कादंबरीत स्त्रीच्या स्वातंत्र्याचा आणि समाजातील तिच्या स्थानाचा प्रश्न उपस्थित केला आहे.

- गौरी देशपांडे - एकेक पान गळावया
- ज्योत्सना देवहार - यांनी, स्त्रीच्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचे चित्रण केले आहे.

  उदा- घर गंगेच्या काठी संसार

  यामुळे चिक साहित्य आधुनिक समाजाचे वास्तव चित्रण करते.

## चिक साहित्याचे महत्व :-

१) स्त्रियांच्या अनुभवाना साहित्यामध्ये स्थान मिळते.

२) समाजातील स्त्रीयांच्या समस्याकडे लक्ष वेधले जाते.

३) स्त्री स्वातंत्र्य आणि समानतेची जाणीव निर्माण होते.

४) आधुनिक जीवनातील बदलांचे प्रतिबिंब दिसते.

## चिक साहित्य आणि स्त्रीवाद :-

चिक साहित्याचा संबंध स्त्रीवादाशी देखील जोडला जातो. स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या समानतेसाठी आणि स्वातंत्र्यासाठी केलेला विचारप्रवाह, चिक साहित्यामध्ये स्त्रियांच्या अनुभवाना आणि भावनांना महत्व दिले जाते. त्यामुळे स्त्रियांच्या सामाजिक स्थानाविषयी जागरुकता निर्माण होते तथापी काही समीक्षकाच्या मते चिक साहित्य हे केवळ मनोरंजन प्रधान असते आणि हयामध्ये

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

गंभीर सामाजिक प्रश्नावर कमी चर्चा केली जाते. तरीही स्त्रियांच्या अनुभवांना साहित्यामध्ये स्थान देण्याचे महत्व या साहित्य प्रकारामुळे वाढले आहे.

## **चिक साहित्याचा समाजावर परिणाम :-**

चिक साहित्याचा समाजावर अनेक प्रकारे परिणाम झाला आहे. विशेषत: महिलांच्या विचारसरणी आणि आत्मविश्वासावर त्याचा सकारात्मक प्रभाव दिसून येतो.

- महिलांच्या समस्यांना अभिव्यक्ती मिळाली.
- महिलांच्या स्वातंत्र्याची जाणीव वाढली.
- आधुनिक जीवनशैलीचे चित्रण झाले.
- तरुण पिढीमध्ये वाचनाची आवड.

यामुळे चिक साहित्य हे केवळ मनोरंजनापूरते मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनले आहे.

## **लोकप्रिय संस्कृती, चिक भाषा आणि चिक साहित्य यांचा परस्पर संबंध :-**

लोकप्रिय संस्कृती, चिक भाषा आणि चिक साहित्य यांचा संबध परस्परपूरक स्वरूपाचा आहे. लोकप्रिय. संस्कृतीमुळे समाजामध्ये नवीन विचार, नवीन जीवन शैली आणि नवीन भाषा शैली निर्माण होते. या बदलाचा प्रभाव साहित्यावरही पडतो.

चिक साहित्य लिहिताना लेखक आणि लेखिका लोकप्रिय संस्कृतीतील घटकांचा वापर करतात. उदाहरणार्थ आधुनिक जीवनशैली, सोशल मीडिया, फॅशन, करिअर प्रेमसंबंध आणि शहरी जीवन यांचे चित्रण या साहित्यामध्ये केले जाते. त्याचप्रमाणे चिक साहित्य मध्ये वापरली जाणारी भाषा ही बहुतेक वेळा चिक भाषा असते. त्यामुळे साहित्य अधिक वास्तववादी आणि जिवंत वाटते. वाचकांना त्या साहित्यामध्ये स्वतःचे अनुभव दिसतात. लोकप्रिय संस्कृती भाषा आणि साहित्याला नवीन दिशा देते. तर साहित्य त्या संस्कृतीचे प्रप्रतिबिंब समाजासमोर मांडले. त्यामुळे या तिन्ही

संकल्पना ऐकमेकावर प्रभाव टाकतात. तसेच चिक भाषामुळे भाषेमध्ये नवीन शब्दप्रयोग आणि शैली निर्माण होतात. ही भाषा तरुण पिढीमध्ये अधिक लोकप्रिय आहे.

लोकप्रिय संस्कृती, चिकभाषा, चिक साहित्य या तिन्ही संकल्पना आधुनिक समाजातील महत्वाचा घटकापैकी आहेत. लोकप्रिय संस्कृतीमुळे नवीन भाषा साहित्याची निर्मिती होते. चिक भाषा ही आधुनिक स्त्रियांची संवादशैली दर्शविते तर चिक साहित्य त्यांच्या जीवनातील अनुभव आणि भावविश्व व्यक्त करते त्यामुळे या तिन्ही संकल्पना एकमेकांशी घनिष्ठपणे जोडलेल्या असून त्या आधुनिक समाजातील सांस्कृतिक बदलाचे प्रतिबिंब आहे.

**निष्कर्ष :**

१) लोकप्रिय संस्कृती आणि चिक साहित्य यांचा एकमेकाशी जवळचा संबंध आहे.

२) चिक साहित्यामध्ये मुख्यत्वे आधुनिक तरुण स्त्रीचे जीवन, तिच्या भावभावना, प्रेमसंबध, करिअर स्वातंत्र्याची जाणीव आणि सामाजिक बदल यांचे वास्तववादी चित्रण केलेले आढळते.

३) या साहित्याची भाषा संवादात्मक आणि बोलीभाषेशी जवळीक साधणारी आहे.

४) चिक साहित्य हे केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न राहता ते आधुनिक स्त्रिचे बदलते व्यक्तिमत्व, तिची मानसिकता आणि समाजातील स्थान यांचेही प्रतिनिधित्व करते.

५) लोकप्रिय संस्कृतीच्या प्रभावामुळे साहित्याच्या अभिव्यक्तीत नवीन प्रवाह निर्माण झाले आहेत.

६) लोकप्रिय संस्कृतीच्या प्रभावामुळे चिक साहित्य अधिक आधुनिक, वास्तववादी आणि वाचकाभिमुख झाले असून ते समकालीन समाजातील स्त्रीच्या जीवनानुभवाचे प्रभावी प्रतिबिंब दर्शविते.

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

७) या साहित्यामुळे महिलांच्या आत्मविश्वासाला चालना मिळाली आहे आणि समाजामध्ये नवीन विचार सरणी विकसित झाली आहे.

**<u>संदर्भग्रंथ :-</u>**

(१) लोक संस्कृती आणि साहित्य - नागनाथ कोतापल्ले (डायमंड प्रकाशन)

(२) आधुनिक मराठी साहित्याचा इतिहास - नागनाथ कोतापल्ले - दिलीपराज प्रकाशन

(३) John storey – Cultural Theory and papular Culture.

(४) कादंबरीचे विवेचन आणि विश्लेषन - बालशंकर देशपांडे - स्नेहवर्धन प्रकाशन

(५) मराठी कादंबरीची वाटचाल - सुमती कुलकर्णी - दिलीपराज प्रकाशन

(६) साहित्य आणि समाज - भालचंद्र नेमाडे - पापुलर प्रकाशन मुंबई

(७) साहित्य आणि संस्कृती - नागनाथ कोतापल्ले - मौज प्रकाशन

(८) मराठी साहित्याचा इतिहास – रा. ग. जाधव - मौज प्रकाशन